पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ०५ दिनांक - ०२/०१/२०२४**

वारजे माळवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर

# चारीत्र्याच्या संशयावरुन पतीने पत्नीचा निघृण खुन करुन पळुन जात असताना ५ तासात केले आरोपीस जेरबंद

दिनांक ०२/०१/२०२४ रोजी वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर हद्दीमध्ये संभानगर, हिंगणे होम कॉलनी, कर्वेनगर पुणे येथे पती पत्नीचे संशयाचे कारणावरुन वाद झाल्याने रागाच्या भरात पतीने घरातील फरशी कुऱ्हाडीने पत्नीवर वार करुन तिला जिवे ठार मारुन घरातुन पळुन गेला. सदरच्या घटनेची माहिती वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर कडील पोलीसांना समजताच मा. सहाय्यक पोलीस आयुक्त कोथरुड विभाग श्री.भिमराव टेळे, तसेच वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्री.सुनिल जैतापुरकर,पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री.अजय कुलकर्णी यांनी आरोपी नामे लखन बालाजी कांबळे, रा.संभानगर, हिंगणे होम कॉलनी, कर्वेगनर, पुणे याचा शोध घेणेकामी वरिष्ठांनी तपासाबाबत सुचना दिल्या.

तपास पथकाच्या दोन टिम तयार करुन वेगवेगळ्या ठिकाणी रवाना केले असता तपास पथकाचे अधिकारी पोउपनिरी पार्वे यांना बातमीदारामर्फत ''आरोपी हा त्याचे मुळ गावी उस्मानाबाद येथे सोलापुर हायवेने यवत मार्गे मोपेड दुचाकीवरून जात आहे, अशी बातमी मिळाली. त्यानंतर सदरची बातमी वरिष्ठांना कळवुन तात्काळ आरोपीचा मागोवा घेण्यासाठी पोउपनिरी रामेश्वर पार्वे सोबत पोलीस अंमलदार हनमंत मासाळ व श्रीकांत भांगरे यांचे पथक खाजगी वाहनाने रवाना केले.

नमुद आरोपी हा यवत येथुन पुण्याचे दिशेने परत येत असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर तपास पथक यवतचे दिशेने जात असताना नमुद इसम हा हायवेने रस्त्याचे विरुद्ध दिशेने पुण्याकडे येत असल्याचा दिसुन आल्याने तात्काळ त्याचा पाठलाग चालू केला. त्याचा पाठलाग करत असताना त्याचे दुचाकी मोपेड वरून नमुद आरोपी हा लखन बालाजी कांबळे हाच असल्याची खात्री झाल्याने त्यास लोणीकाळभोर टोलनाक्याचे जवळ गाडी आडवी मारुन थांबविले असता तो त्याची गाडी सोडुन रस्त्याने पळु लागल्याने तपास पथकाने त्यांचेजवळील वाहन रस्त्यावर सोडुन त्याचा पाठलगा करुन पोउपनिरी रामेश्वर पार्वे अमंलदार हनमंत मासाळ, श्रीकांत भांगरे यांनी त्यास ताब्यात घेतले असता त्याचेकडे गुन्ह्याबाबत विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याचे मान्य केल्याने त्यास ताब्यात घेवून वारजे माळवाडी पोलीस स्टेशन येथे आणण्यात आले आहे. सदर बाबत गुन्हा दाखल होण्याचे काम चालू असुन गुन्हा दाखल होण्याचे आतमध्ये आरोपीस ताब्यात घेण्यात आले असुन अधिक तपास श्री सुनिल जैतापुरकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वारजे माळवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर हे करत आहेत.

सदरची कामगिरी ही मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग,पुणे श्री प्रविण पाटील मा.पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०३, श्री संभाजी कदम मा.सहाय्यक पोलीस आयुक्त कोथरुड विभाग.श्री भिमराव टेळे वारजे माळवाडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक .श्री सुनिल जैतापुरकर,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री अजय कुलकर्णी यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पोलीस उपनिरीक्षक श्री नरेंद्र मुंढे, श्री रामेश्वर पार्वे, पोलीस अंमलदार प्रदिप शेलार, हनुमंत मासाळ, बंटी मोरे, श्रीकांत भांगरे, विक्रम खिलारी, अमोल सुतकर यांनी केली आहे.